MHBU140022792025

## निशाणी क्रमांक १ वरील आदेश

(पारित दिनांक ११/०३/२०२६)

१. अर्जदारांनी मुंबई अधिनियम–VIII, १८२७ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. मय्यत रविंद्र बद्रीनारायण गाडगे त्यांचे दिनांक ०४/०८/२०२५ रोजी मेहकर ता. मेहकर जि. बुलडाणा येथे निधन झाले. अर्जदार ही मयताची आई आहे. तसेच अर्जदाराला शासकीय, निमशासकीय कामासाठी तसेच वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे अर्जदाराने सदरचा अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जदारांच्या अर्जावर जाहीरनामा प्रसिध्द करण्यात आला. तसेच दैनिक "सामना" वृत्तपत्रामधून *निशाणी क्र.१४* प्रमाणे जाहीर नोटीस देण्यात आली. परंतु कोणीही हरकत घेतली नाही. अर्जदार ह्यांनी आपल्या कथनाच्या समर्थनार्थ *निशाणी क्र.११* ला अर्जदार यांनी प्रतिज्ञापत्र दाखल केले, तसेच मय्यत रविंद्र बद्रीनारायण गाडगे, नगरपरीषद कार्यालय, मेहकर ता. मेहकर जि. बुलडाणा यांनी निर्गमित केलेले मृत्युचा दाखला *निशाणी क्र.१२* वर दाखल केले आहे. अर्जदार यांचे आधार कार्डाची साक्षांकीत प्रत *निशाणी क्र.१३* वर दाखल आहे. हिंदु विवाह कायदा १९५५ चे कलम १३(ब) नुसार आपसात संमतीने घटस्फोट मिळण्याची कौटुंबिक न्यायालय, जालना येथील डिक्रीची झेरॉक्स प्रत *आर्टीकल अ* वर दाखल केली आहे. त्यावरुन असे दिसते की, मय्यत रविंद्र गाडगे विवाहित असुन त्यांचे २१/१०/२०२१ रोजी

फारकत झालेली होती. तसेच रेशन कार्डची छायांकित प्रत *आर्टीकल ब* वर दाखल केली आहे. त्यावरुन अर्जदार यांचे शिवाय मय्यत रविंद्र बद्रीनारायण गाडगे यांना इतर कोणीही वारस नसल्याचे प्रथमदर्शनी पुराव्यावरुन दिसुन येते. वारस प्रमाणपत्र देण्याबाबत कोणीही हरकत न घेतल्यामुळे अर्जदार ही मय्यत रविंद्र बद्रीनारायण गाडगे यांचे वारस आहेत, अशी मान्यता देण्यात यावी असे या न्यायालयाचे मत आहे. म्हणुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्जदारांचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार **सुमन बद्रीनारायण गाडगे,** मय्यत **रविंद्र बद्रीनारायण गाडगे**, यांचे वारस आहे अशी मान्यता देण्यात येते.

३. अर्जदाराच्या नावे नियमाप्रमाणे आवश्यक ती स्टॅम्प ड्युटी घेवुन वारस प्रमाणपत्र जारी करण्यात यावे.

स्वा/-

मेहकर.
दि.११/०३/२०२६

**(सपना मि.पाटील)**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
तथा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मेहकर.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this PDF file Judgment/order are same word for word, as per original Judgment/order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : H. L. Korde |
| Name of the Court | : Jt. C.J.J.D. and J.M.F.C., Mehkar. |
| Dated | : 11/03/2026 |
| Order uploaded on | : 13/03/2026 |